**आर बी आय / २००६-०७/२११**
संदर्भ क्र. - डीजीबीए. सीडीडी. क्र. एच- **९७४१**/ १५.१५.००१/ २००६-०७

डिसेंबर १८, २००६

प्रति,
महाव्यवस्थापक
शासकीय लेखा विभाग, प्रधान कार्यालय
स्टेट बँक ऑफ इंडिया/स्टेट बँक ऑफ इंदौर/स्टेट बँक ऑफ पतियाळा /स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर/स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र /स्टेट बँक ऑफ त्रावणकोर/स्टेट बँक ऑफ हैद्राबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया / विजया बँक/ आय सी आय सी आय बँक लि.

प्रिय महोदय,

**वरिष्ठ नागरिक बचत योजन, २००४**
**मुदतपूर्व निकासीसाठी व्याज प्रदान - स्पष्टीकरण**

वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ खाली, मुदतपुर्व निकासीच्यावेळी , ठेवीदाराला तुटक कालाच्या (ब्रोकन पिरियड ) व्याजाच्या प्रदानासंबंधी आमच्याकडे अनेक विचारणा (क्वेरीज )केल्या जात आहेत. ही बाब , भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाकडे संदर्भित केली असता, त्यांचे पत्र क्र. एफ १५/८/२००५/एन एस -II दिनांक मे ११, २००६ अन्वये त्यांच्याकडून स्पष्टीकरण देण्यात आले की, या योजनेच्या नियम ९(१) (ए) (बी) खाली, मुदतपूर्व निकासीच्या वेळी, दंडात्मक रक्कम ही ठेवीच्या रकमेतून वळती करण्यात यावी. आणि म्हणून दंडात्मक रक्कम ही मुद्दल (मूळ) रकमेतून कापली जावी. तथापि, ठेवीची एकूण रक्कम ही त्या खात्यात मुदतपूर्व निकासीच्या तारखेपर्यंत उपलब्ध असल्या कारणाने, ठेवीच्या एकूण रकमेवर ९% च्या दराने, निकासीच्या तारखेपर्यंतचे व्याज देण्यात यावे.

२. या पत्रातील मजकूर, ही योजना कार्यान्वित असलेल्या आपल्या बँकेच्या नियोजित शाखांच्या निदर्शनास आणावा.

३. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

( बालु.के)
उप महाव्यवस्थापक